**महाराष्ट्र शासन**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपुर.**

**Govt. Medical College & Hospital,Nagpur**

संदर्भ:क्रमांक शावैमरुग्णा/आस्था १,२/ 3068 /२१ दिनांक 18/03/२०२१

**जाहिरात**

**विषय :-शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर, ग्रामिण आरोग्य प्रशिक्षण केंद्र सावनेर तसेच अतिविषेशोपचार रुग्णालय, नागपूर येथील रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ची पदे, १२० दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत.**

संदर्भ :-१.शासन निर्णय क्र.डिएसबी१२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३,दि.१०.०८.२००१
२.शासन निर्णय क्र.एमईएस-१५०८/प्र.क्र.९४/०८/वैसेवा-१,दि.०७.०९.२०११
३.दिनांक १६/०३/२०२१ रोजीची मान्य टिपणी

उपरोक्त संदर्भांकीत विषयाच्या अनुषंगाने सद्यस्थितीत कोरोना (कोविड-१९) या संसर्गजन्य आजारामुळे व दिवसेंदिवस कोरोना (कोविड-१९) रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता रुग्णसेवेत अडचणी निर्माण होऊ नये याकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर ग्रामिण आरोग्य प्रशिक्षण केंद्र सावनेर तसेच अतिविषेशोपचार रुग्णालय, नागपूर येथील आस्थापनेतील खालील प्रमाणे नमुद पदनिहाय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे रिक्त पदे विभागीय निवड मंडळामार्फत (Bonded) बंधपत्रीत उमेदवारांकडुन मुलाखतीद्वारे भरण्यास पृथक अर्ज मागवून संचालनालयाकडुन किंवा एमपीएससी मार्फत किंवा नियमीत उमेदवार प्राप्त होईपर्यंत केवळ तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसाकरीता भरण्यात येईल. सदरची नियुक्ती केवळ १२० दिवसाकरीताच राहील. करीता बंधपत्रीय उमेदवारांकडुन पृथक अर्ज मागविण्यात येत आहे.छापील कोरे अर्ज **दि.20.०३.२०२१ ते दि.30.०३.२०२१** पर्यंत कार्यालयीन वेळेत वैद्यकिय अधिक्षक कार्यालयात उपलब्ध आहे. अर्ज **दि. 30. 03 .२०२१ रोजी ५.००** वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल. **(मुलाखत दि. 03.04.२०२१ वेळ ३.०० वाजता)**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर.येथिल वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे**

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | असिस्टन्ट सर्जन वर्ग-२ | १ | एमबीबीएस/ पदव्युत्तर पदवी | ७५०००/- |
| २. | सर्जिकल रजिस्टार वर्ग-२ | १ | एमबीबीएस/ पदव्युत्तर पदवी | ७५०००/- |
| ३. | रेसिडेंड फिजीशियन वर्ग-२ | २ | एमबीबीएस/ पदव्युत्तर पदवी | ७५०००/- |
| ४. | रेसिडेंड ऑबस्टीशियन वर्ग-२ | २ | एमबीबीएस/ पदव्युत्तर पदवी | ७५०००/- |

**अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथिल वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे खालील प्रमाणे**

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी | ३ | एमबीबीएस | ७५०००/- |

आरोग्य पथक सावनेर,जिल्हा नागपूर.येथिल वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे खालील प्रमाणे

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | २ | एमबीबीएस | ७५०००/- |

वरिल पदांसाठी **मुलाखत दि. ०३.०४.२०२१ रोजी ठिक ३.०० वाजता** अधिष्ठाता यांचे दालनात ठेवण्यात आली आहे. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता कोणताही प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहनार नाही.मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी अर्ज संस्था प्रमुखामार्फत सादर करावे.उपरोक्त पदे अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात भरायची असल्याने नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

वरिल जाहिराती मधील पदांच्या संस्थेत कमी/अधिक करण्याचा व तसेच निवड समिती मार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबीत ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे अथवा सदर जाहिरात रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना असतील.

**वैद्यकीय अधिकाऱ्यांची वेतन श्रेणी :-** शा.नि.क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३ /मंत्रालय मुंबई, दि.३१ डिसेंबर २०२० अन्वये **एकत्रित ठोक मासिक मानधन ७५०००/-** प्रमाणे देण्यात येईल.

वयोमर्यादा :- खुला वर्ग ३५ वर्ष, मागासवर्गीयांकरीता ४० वर्ष नियम व अटि अर्जासोबत उपलब्ध आहेत.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय
नागपूर.

# जाहिरातीच्या शर्ती व अटि

विषय :- स्थानिय निवड समिती मार्फत (डिएसबी) तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसासाठी वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरण्याबाबत.......

१) **अर्ज मागविण्याबाबत** :- जाहीरातीमध्ये दर्शविलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर. अतिविषेशोपचार रुग्णालय तसेच ग्रामिण आरोग्य प्रशिक्षण केंद्र सावनेर येथिल वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी या जाहीरातीद्वारे आवश्यक ती अर्हता/पात्रता धारण करणाऱ्या बंधपत्रीत उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२) **अर्हता/पात्रतेबाबत** :-

अ) वैद्यकीय अधिकारी या पदासाठी शासन र्निणय वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,मुंबई. यांचे पत्र क्र. डिएसबी /प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३/,दि.२७/०२/२००४ मधील तरतुदीनुसार उमेदवार बंधपत्रीत असला पाहीजे व त्याने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेला असला पाहिजे.

ब) पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याची नोंद उमेदवाराच्या महाराष्ट्र मेडीकल कॉन्सीलच्या अथवा इंडियन मेडिकल कॉन्सीलच्या नोंदणी प्रमाणपत्रावर झालेली असावी.

क) मुलाखतीच्या दिनांकास अर्जदाराने विहीत अर्हता/पात्रता धारण केलेली असली पाहिजे.

३) **वयोमर्यादा** :- वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सर्व पदाकरीता खुल्या वर्गातील उमेदवारंसाठी उतेदवार ३५ वर्षाहुन अधिक वयाचा नसावा मात्र मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४० वर्षापर्यंत शिथीलक्षम राहीज.

४) **वेतनश्रेणी** :- शा.नि.क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३ /मंत्रालय मुंबई, दि.३१ डिसेंबर २०२० अन्वये **एकत्रित ठोक मासिक मानधन** **७५०००/-** प्रमाणे देण्यात येईल.

५) **अंतीम दिनांक** :- अर्ज सादर करण्याचा अंतिम **दिनांक ३०/०३/२०२१** पर्यंत राहील.

६) **अर्ज सादर करण्याबाबत** :-

१) विहीत नमुन्यात संपुर्णपणे व योग्य तऱ्हेने भरलेले अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सांक्षांकित छायाप्रतिसह वर उल्लेख केलेल्या अंतिम दिनांकापुर्वी व वेळेपुर्वी या महाविद्यालयात प्रत्यक्ष सादर करणे,तसेच अपुर्ण भरलेले,प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत छायाप्रति सोबत नसलेले अर्ज स्विकारले/विचारात घेतले जाणर नाहीत याची नोंद घ्यावी.

२) जे उमेदवार या अगोदर या महाविद्यालयात/रुग्णालयात अथवा अन्यत्र शासकीय/खाजगी सेवेत असतील त्यांनी त्यांचे निहीत नमुन्यातील भरलेले अर्ज त्यांच्या विभागामार्फत /संस्येमार्फतच तसेच संबंधित विभाग प्रमुखांच्या/संस्या प्रमुचांच ना हरकत प्रमाणपत्र या कार्यालयास अंतिम दिनांकापुर्वी सादर करणे आवश्ये आहे.अशा उमेदवारांनी परस्पर या करार्यालयास अर्ज सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

३) ज्या उमेदवारांनी या अगोदर म्हणजे जाहिरात प्रदर्शित होण्याअगोरदर साध्या कावदावर अर्ज केले असतील त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज अंतिम दिनांकापुर्वी या कार्यालयास आवश्यक त्या प्रेमाणपत्रांच्या सांक्षांकित प्रतिसह सादर करावा.पुर्वीचे साध्या कागदावरिल अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७) **विहीत नमुन्यातील अर्जाबराबर सादर करावयाची कागदपत्रे** :-

उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज योग्य तऱ्हेने व संपुर्ण भरल्यानंतर त्यासोबत पुढिल कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतिसह सादर करणे आवश्यक आहे.

१) प्रथम,द्वितीय,तृतिय वर्ष एम.बी.बी.एस.उत्तीर्ण गुणपत्रीका व पदवी प्रमाणपत्र

२) पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण व गुणपत्रीका व पदवी प्रमाणपत्र

३) प्रयत्नाचे प्रमाणपत्र

४) जन्म तारखेचे प्रमाणपत्र/माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र

५) जातीचे प्रमाणपत्र व जाती वैधता प्रेमाणपत्र ज्या संवर्गासाठी नॉन-क्रिमीनेयर प्रमाणपत्र आवश्यक आहे.त्या संवर्गातल्या उमेदवारांना ते सादर करणे आवश्यक आहे.

६) अनुभवाचे प्रमाणपत्र

७) बंधपत्रीय उमेदवार असल्याचे प्रमाणपत्र जोडुन बंधपत्रीय कालावधी कधी सुरु झाला पैकी किती कालावधी पुर्ण केला याबाबतीत योग्य ते पुराव्याचे कागदपत्रे जोडणे उमेदवारास बंधनकारक आहे.त्याशिवाय त्यास नियुक्ती देता येनार नाही.

८) महाराष्ट्र मेडीकल कॉन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र

जे उमेदवार खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस.परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील व बंधपत्रीत उमेदवार म्हणुन दावा करीत असतील त्यांनी संबंधित महाविद्यालयाकडुन ते शासकीय सेवा करण्यास बंधपत्रीत असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

त्याशिवाय त्यांचा बंधपत्रीत उमेदवार म्हणुन विचार केला जाणार नाही.तसेच अशा उमेदवारांनी नियुक्ती स्विकारुन मध्येच नोकरी सोडली तर त्यांना बंधपत्राच्या दंडाची रक्कम या कार्यालयास भरावी लागेल याची नोंद घ्यावी.

**८) <u>निवड प्रक्रियाबाबत</u>** :- स्थानिक निवड मंडळामार्फत उमेदवारांची त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध जागेनुसार तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवससाकरीता निवड केली जाईल.

**९) <u>उमेदवारांच्या निवडीबाबत प्राधान्य क्रम</u>** :-

**अ)** शा.नि.क्र.डिएसबी-१२०१/प्र.क्र.२७६/२००१/वैसेवा-३,दि.२७/०२/२००४ मधील तरतुदिनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर.येथुन पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या बंधपत्रीत उमेदवारास निवडीमध्ये प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल.

**ब)** उपरोक्त निवडी नंतरही काही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रातील अन्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन पदवीत्तर,पदवी अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या बंधपत्रीय उमेदवारांच्या निवडीसाठी विचार केला जाईल.

**क)** १) "ब"प्रक्रियेनंतरही जागा शिल्लक राहिल्यास महाराष्ट्रातील खाजगी महाविद्यालयातुन पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या **बंधपत्रीत** उमेदवारांचया निवडीसाठी विचार केला जाईल.

२) "ब" प्रक्रियेनंतही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्रातील खाजगी महाविद्यालयातुन पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या अबंधपत्रीय उमेदवारांच्या निवडीसाठी विचार केला जाईल.

**ड)** "क" प्रक्रियेनंतरही काही जागा शिल्लक राहील्यास महाराष्ट्र बहेरीज उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार निवडीसाठी विचार केला जाईल.

**१०) <u>मुलाखतीबाबत</u>** :-

१) संपुर्ण पणे भरलेला अर्ज **<u>दिनांक30/03/२०२१ दुपारी ५.००</u>** वाजता अधिष्ठाता,शासकीय वैकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर.यांचे दालनात वैद्यकीय अधिकारी या पदासाठी उमेदवारांच्या मुलाखती घण्यात येईल. त्यासाठी कोणालाही वैयक्तिकरित्या लेखी/तोंडी कळविले जाणार नाही.

२) मुलाखतीस उशिरा आल्यास/गैरहजर राहील्यास अशा उमेदवारांचा विचार केला जाणार जाही व नंतर त्याबद्दल कोणतेही तक्रार/निवेदन स्विकारले/विचारात घेतले जाणार नाही.

३) उमेदवारांनी स्वखर्चाने दिलेल्या वेळेत व दिनांकास मुलाखतीसाठी सर्व मुळ कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**११) <u>प्रतिक्षा यादी बाबत</u>** :- वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या पदापेक्षा अर्जदाराची संख्या जास्त असेल तर अशा ठिकाणी उर्वरित उमेदवारांना प्रतिक्षा यादीवर ठवण्यात येईल.मात्र मुलाखतीस गैरहजर असणाऱ्या अमेदवारांचा त्यात समावेश केला जाणार नाही.

**१२) <u>इतर अटि व शर्ती</u>** :-

१) शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले नियम/अटि/शर्ती तसेच येथुन पुढे अमलात येणारे नियम/अटि/शर्ती निवड झालेल्या उमेदवारांवर बंधनकारक असतील.

२) जे उमेदवार बंधपत्रित असतील त्यांनी बंधपत्रित सेवा पुर्ण करणे आवश्यक आहे.नियुक्ती मिळाल्यास त्यांना मध्येच नियुक्ती सोडावयाची झाल्यास बंधपत्र दंडाची रक्कम भरावी लागेल.त्याशिवाय त्यांना कोणतेही प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

३) मागासवर्गीय उमेदवारांनी आवश्यक ती जात,जातवैधता,नॉन क्रिमीनल,प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा त्यांचा विचार खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजुन केला जाईल याची नोंद घ्यावी.

४) उमेदवार विवाहीत असल्यास त्याला २ पेक्षा जास्त अपत्या नसावीत.

५) ज्या उमेदवारांविरुध्द निवासी पदावर किंवा वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत असतांना शिस्तभंगाची कार्यवाही झाली असेल व त्यांची सेवा समाप्त केल्या असतील अशा अमेदवारांच्या नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

**१२) <u>रुजु अहवाल सादर करण्याबाबत</u>** :- निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या कामावर रुजु झाल्याचे अहवाल द्विप्रतीत या कार्यालयास सादर करावेत अन्यथा यांचे वेतन व भत्ते काढण्यास विलंब झाल्यास हे कायालय जबाबदार राहणार नाही.

**१३) <u>जाहिराती मधील मजकुरात बदल करण्याबाबत</u>** :- या जाहिरातीमधील कोणताही मजकुरात नियम/अटि/शर्ती/आरक्षण/पदसंख्य इ.मध्ये केव्हाही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठातांनी राखुन ठेवले आहेत.तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे या बाबतचे अंतिम अधिकारही अधिष्ठाता यांना असतील